Edit with WPS Office

# विद्यापीठ व महाविद्यालयस्तरीय राष्ट्रीय सेवा योजना शिबिर संपन्न

आर्वी– स्थानीय कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय द्वारे श्री संत लहानुजी महाराज संस्थान टाकरखेडा येथे आयोजित विद्यापीठ व महाविद्यालयीन स्तरीय राष्ट्रीय सेवा योजना शिबिर दि. 24 ते 30 मार्च दरम्यान पर्यंत आयोजित करण्यात आले. आजादी का अमृत महोत्सव निमित्त आत्मनिर्भर भारत या संकल्पनेवर आधारित या शिबिरात ची सुरुवात दिनांक 24 मार्चला झाली. विद्यार्थ्यांची नोंदणी केल्यानंतर परिसर स्वच्छता करण्यात आली व सात दिवसाचा आराखडा तयार करून त्यावर चर्चा करण्यात आली. दिनांक 25 मार्चला सकाळी ठीक साडे पाच वाजता पासून योगासन, प्राणायाम केल्यानंतर गावात जनजागृती रॅली काढण्यात आली व लोकांना स्वच्छतेबाबत जागरूक करण्याकरिता शिबिरार्थींनी रॅलीचे आयोजन केले होते. सकाळी 11वाजता शिबिराचे उद्घाटन कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते या कार्यक्रमात अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हरिभाऊ वेरुळकर उपस्थित होते. उद्घाटक म्हणून श्री संत लहानुजी महाराज संस्थान चे अध्यक्ष श्री बाळासाहेब पावडे उपस्थित होते. प्रमुख अतिथी म्हणून आर्वीचे पोलीस निरीक्षक श्री भानुदास पिदुरकर उपस्थित होते. विशेष अतिथी म्हणून टाकरखेडा येथील सरपंच मा.सौ. सरिताताई मेश्राम उपस्थित होत्या.तसेच ग्राम सचिवश्री प्रफुल ठाकरे उपस्थित होते. रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. नागेश खोब्रागडे, डॉ विजया मुळे मंचावर उपस्थित होते. सर्वप्रथम कार्यक्रमात मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात आली. कार्यक्रम अधिकारी डॉ श्यामप्रकाश पांडे यांनी प्रास्ताविक मांडले. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते एन. एस. एस. ध्वजारोहन करण्यात आले. आपल्या उद्घाटनपर भाषणात श्री बाळासाहेब पावडे यांनी परिसरातील अध्यात्मिकतेसा आपला अंगी कसे ग्रहण करावे जेणे करून शिबिर काळात संपूर्ण लाभ मिळेल व जीवनात एक नवीन दिशा मिळेल याची प्रचिती करून दिली. प्रमुख अतिथी भानुदास पिदुरकर यांनी विद्यार्थ्यांना कोणत्याही पदावर राहताना समाजासाठी व देशासाठी कसे कार्य करावे ही जाणीव करून दिली. अध्यक्षीय संबोधनात प्राचार्य डॉ वेरुळकर यांनी जर आपण खरंच शिबिरात लक्ष देऊन कार्य केले तर जीवनात यशस्वी होण्याचा मार्ग एन. एस. एस. मधून मिळू शकते हे लक्ष बोध करून दिले. यानंतरच्या दुपारच्या बौद्धिक प्रबोधनाच्या सत्रात आर्वी पंचायत समितीचे गट विकास अधिकारी डॉ. गणेश एल.माने यांनी आत्मनिर्भर भारतात गावांची भूमिका या विषयावर शिबिरार्थींना मार्गदर्शन केले.या कार्यक्रमाची अध्यक्षता डॉ.पवन ठाकरे यांनी केले. त्यानंतर सांस्कृतिक कार्यक्रमांतर्गत कुमारी अनुष्का ओमप्रकाश सोनोने याने 'मी सावित्री बोलतोय' हे एक पात्री प्रयोग सादर केले.

दिनांक 26/ 3/ 2022 सकाळी साडेपाच वाजता योग आसन प्राणायाम कार्यक्रमाने शिबिराची सुरुवात झाली विद्यार्थ्यांनी गावात जल ही जीवन है या विषयावर रॅली काढून जनजागृतीपर घोषणा दिल्या व लोकांना पाण्याचे योग्य उपयोग करण्याकरिता जागृत केले. दुपारच्या प्रबोधनपर सत्रात स्वराज्य ज्ञान प्रबोधिनीचे संचालक प्रा. विशाल येलेकर यांनी स्पर्धा परीक्षा - आव्हाने व संधी या विषयावर शिबिरार्थींना मार्गदर्शन केले.कार्यक्रमाची अध्यक्षता डॉ.पुरुषोत्तम माळोदे यांनी केली. या नंतर आर पी पोटे कॉलेज ऑफ मेडिकलसायन्सेसचे चे डिन व मुख्य चिकित्सा अधिकारी डॉ. श्यामसुंदर भुतडा यांनी राष्ट्रीय सेवा योजना - आत्मनिर्भरतेचे पहिले पाऊल या विषयावर शिबिरार्थीनाय मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अनिल दहाट उपस्थित होते. यानंतर संध्याकाळी सांस्कृतिक कार्यक्रमाचा सत्रात साऊर येथील सामाजिक कीर्तनकार श्री गजानन भोरे यांनी आपल्यात कीर्तनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे व गावकऱ्यांचे मनोरंजनात्मक प्रबोधन केले. या कार्यक्रमाला गावकऱ्यांची मोठी उपस्थिती होती. दिनांक 27/03/22 रोजी सकाळी साडेपाच वाजता योगासन प्राणायाम द्वारे शिबिराची सुरुवात झाली. या नंतर इंडियन रेड क्रॉस सोसायटी शाखा आर्वी, श्री संत लहानुजी महाराज संस्थान टाकरखेडा व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले होते. रासेयोच्या शिबिरार्थींनी आरोग्य शिबिरात आपले योगदान दिले. शिबिरात मोठ्या संख्येने गावकऱ्यांचे रोग निदान व औषध वितरण करण्यात आले. दुपारच्या प्रबोधन सत्रात नेरी मिर्जापुर चे माजी सरपंच श्री बाळाभाऊ सोनटक्के यांनी यशोगाथा एक आदर्श गावाची च्या माध्यमातून एक नवीन पुनर्वसित गावाला आदर्शगाव बनवण्यापर्यंतचे आपल्या अनुभवातून कथन करित शिबिरार्थींना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाची अध्यक्षता प्रा. गणेश येरावार यांनी केली

दुसरे प्रबोधन सत्रात प्रमुख वक्ते यशवंत महाविद्यालय येथील हिंदी विभाग प्रमुख डॉ. संजय धोटे यांनी ग्रामगीता व आत्मनिर्भर भारत या विषयावर शिबिरार्थींना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाची अध्यक्षता प्रा. नागेश खोब्रागडे यांनी केली. संध्याकाळच्या प्रबोधन सत्रात तिवसा येथील महाराष्ट्र राज्य अनमोल रत्न पुरस्कार प्राप्त बाल कीर्तनकार कुमारी परमेश्वरी रायजीप्रभू शेलोटकर यांनी शिबिरार्थ्यांचे व गावकऱ्यांचे मनोरंजनात्मक प्रबोधन केले. सोमवार दिनांक 28/ 3 /22 रोजी सकाळी साडेपाच वाजता शिबिरार्थ्यांच्या योगासन प्राणायाम द्वारे कार्यक्रमाची सुरुवात झाली. या नंतर शिबीरार्थींनी गावात जाऊन लोकांच्या घरी भेटी दिल्या व गावकऱ्यांच्या समस्या जाणून घेण्याचा व समजण्याचे प्रयत्न केला. या सर्व बाबीतून विद्यार्थ्यांना गावकऱ्यांशी संवाद साधता आले व गावकऱ्यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले. दुपारी प्रबोधन सत्रात आर्वी फुटवेअर कंपनीचे संचालक श्री राजेशजी कटयारी यांनी आत्मविश्वास से आत्मनिर्भरता की

Edit with WPS Office

ओर या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाची अध्यक्षता डॉ. अनुप गुंबळे यांनी केली स्वच्छता अभियान अंतर्गत ग्राम स्वच्छता कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. यानंतरकवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. या कवी संमेलनाची अध्यक्षता डॉ. ममता साहू यांनी केली. कविवर्य आकाशवाणी कलाकार वसंतराव कोल्हटकर कला महाविद्यालय रोहणा येथील इंग्रजी विभाग प्रमुख डॉ.रुपेश रेडे, श्री अरुण जी मानकर, प्रा.अमर भोगे यांनी आपला कविता सादर केल्या व विद्यार्थ्यांनी आपल्या कवितेच्या माध्यमातून भावनांना व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचालन शायर तौसिफ खान यांनी केले.

संध्याकाळच्या सत्रात विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. या कार्यक्रमात गावकऱ्यांनी आपला सहभाग नोंदविला. मंगळवार दिनांक 29/ 3/22 ला सकाळी योगासन, प्राणायाम नंतर विद्यार्थ्यांनी टाकरखेडा येथील जिल्हा परिषद शाळा, बुद्ध विहार याचे परिसराची स्वच्छता करून शालेय विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे महत्त्व समजावून सांगितले. या स्वच्छता मोहिमेत जि.प, शाळेतील शिक्षकांना यात आपला सहभाग नोंदविला. दुपारी 3.00 वाजता शिबीराचे समारोपीय कार्यक्रमात अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. हरिभाउ वेरुळकर, मुख्य अतिथी म्हणून डॉ. तीर्थनंदन बन्नागरे तर श्री संत लहानुजी महाराज संस्थान चे अध्यक्ष श्री बाळासाहेब पावडे उपस्थित होते आणि विशेष अतिथी म्हणून टाकरखेडा येथील सरपंच मा.सौ. सरिताताई मेश्राम उपस्थित होत्या. संध्याकाळच्या सत्रात विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. महाविद्यालयाच्या डॉ. दिपक चव्हाण, डॉ. किशोर कदम, डॉ. पुरुषोत्तम माळोदे, डॉ. मंजुषा भोयर, डॉ. विनय हिवसे, डॉ. अनिल दहाट, प्रा.मनोहर कोल्हे, डॉ.पवन ठाकरे, प्रा.गणेश येरावार, डॉ. अमर सोटे, प्रा. शैलेश खंदारे, प्रा. जयेश पांडे डॉ.संजय धनविजय, डॉ.प्रवीण काळे, डॉ. सुधाकर भुयार डॉ. विजय खडसे, डॉ. अनुप गुंबळे, डॉ.मनीषा खाकरे, डॉ.नीरज केंडे, डॉ.रोहिणी मेश्राम, प्रा.आशीष पेठे

बुधवार दिनांक 30 मार्च, 22 रोजी सकाळी आठ वाजता शिबिरातीस विद्यार्थ्यांनी टाकरखेडा येथून प्रस्थान केले.